INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# मराठी विज्ञान साहित्याची वाटचाल
## (Progress of Marathi Science Literature)

**सौ. मनिषा संजय ठाकरे**
लेखिका,
तायवाडे कॉलेज, कोराडी, नागपूर

**डॉ. कोमल ठाकरे**
मार्गदर्शक,
तायवाडे कॉलेज, कोराडी, नागपूर

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/08.2023-85533619/IRJHIS2308002

**प्रस्तावना :**

जगातील विज्ञानाच्या वाटचालीकडे बघितले तर असे लक्षात येते की, निसर्गातील रहस्ये उलगडणे किंवा व्यावहारिक समस्या सोडविणे उद्देशाने विज्ञानाची प्रगती झाली. इतिहासात आपण घडून गेलेल्या गोष्टींचा शोध घेत असतो. साहित्य, संस्कृती, कला यासह मानवी जीवनास विज्ञानाच्या शोधाने खूप मदत झाली आहे. यातून विज्ञान विषय लेखनाचे वेगळेपणही विविध वाङःमय प्रकारातून व्यक्त होऊ लागले. एखादया विषयाचे व्यवस्थित रीतीने केलेल्या अभ्यासास विज्ञान असे म्हणतात. विश्वातील घटना व घडामोडी यांचे बुद्धिनिष्ठ, कार्यकरणाधिष्ठित असे आकलन होण्यासाठी मानवाने केलेल्या क्रिया व त्यांचे फलित म्हणजे विज्ञान होय. विज्ञान ही ज्ञानाची एक अतिव्यापक शाखा असून तिच्यात वास्तव गोष्टीचे किंवा वस्तुस्थितीचे निरीक्षण करून त्यांचे वर्गीकरण करतात ािआणि बहुधा त्यांच्यामधील परस्परसंबधाविषयीचे नियम सुत्रबद्ध केले जाते. 'सायन्स' (विज्ञान) हा इंग्रजी शब्द ज्ञान (ज्ञाननिर्मिती) अर्थाच्या 'सायन्शिया' या लॅटिन शब्दावरुन आला आहे. विज्ञानाचे क्षेत्र अतिप्रचंड असून त्यात अगदी भिन्न प्रकारचे विषयही ज्ञान देतात. उदा. अणूपेक्षा लहान असलेल्या मूलकणांमधील विक्रियांपासून ने मानसिक प्रक्रियांपर्यंतचे तर गणितीय नियमांपासून ते वंशिक संबंधातील अर्थकारणापर्यंतचे, ताऱ्यांच्या जन्मापासून तर पक्ष्यांच्या स्थलांतरापर्यंतचे, अतिसूक्ष्म व्हायरसपासून तर आकाशगंगेपर्यंतचे, संस्कृतीच्या उदयापासून तर अणू व विश्वयांच्या उत्पत्ती, स्थिती व लयापर्यंतचे इतके वैज्ञानिक क्षेत्र अतिव्यापक आहे.

विश्वविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या गरजेतून माणसाने विज्ञान निर्माण केले आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षोत क्रांती घडवून आणण्याची शक्ती या विज्ञानात आहे मानवाच्या उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांवर निसर्गाकडून मानवाने ज्ञानार्जन केले व स्वतःची प्रगती करुण घेतली. अन्न, अग्नी, अस्त्रे, शस्त्रे, शेती, निवारा अशा विविध अंगानी मानवाने आपली प्रगती साधली ती केवळ त्याने मिळविलेल्या ज्ञानामुळे विविध संस्कृती काळात मिळविलेल्या ज्ञानामुळे. विविध संस्कृती काळात

मिळालेल्या माहितीचे रूपांतर विज्ञानात झाले. विज्ञान हे इतरांना सांगण्यातच आपली प्रगती आहे हे मानवाच्या लक्षात आले व त्यातूनच ग्रंथनिर्मिती झाली.

पाश्चात्य भाषांमध्ये साहित्यिकांनी विज्ञानावर आधारित कथा, कादंबऱ्या लिहिल्या त्याला 'सायन्स फिक्शन' हे नाव देण्यात आले. विशिष्ट काळानंतर आपल्या देशातही विज्ञानावर आधारित काही कथा, कादंबऱ्या, कादंबऱ्याचे अनुवाद लिहिल्या गेले व त्याला 'विज्ञानकथा' असे नाव दिल्या गेले. सतत बदलत आणि विकसित होत जाणाऱ्या जगाविषयी विज्ञानसाहित्य आपल्याला विचार करायला लावते. आपल्या जाणिवेच्या क्षितीजांचा विस्तार करते. विज्ञानसाहित्य हा आपल्या सामाजिक इतिहासाचा महत्वाचा भाग आहे. आजच्या लोकप्रिय संस्कृतीची ओळख विज्ञानसाहित्यातूनच आपल्याला होतांना दिसत आहे. सर्वसाधारण वाचकांच्या आशा–अपेक्षा, ग्रह–पूर्वग्रह त्यात प्रतिबिंबित होतो आजच्या नव्या पिढीला त्यांच्या बदलत्या विचारशैलीला जाणण्याचा एक मार्ग विज्ञानसाहित्यातून जातो. मराठी विज्ञानसाहित्यही आपल्याला परप्रांतीयांची देण आहे यासंदर्भात मराठी विज्ञानसाहित्यातील आघाडीचे लेखक निरंजन घाटे म्हणतात,''मराठी विज्ञानकथा ही एक तर अनुवादित असते, भाषांतरित असते किंवा मूळ परकीय कल्पनेवर आधारित असते''[१]

वैज्ञानिक आशयाशिवाय जी आकाराला येणार नाही अशा मानवी समस्या व त्यावरील उपाय या भोवती गुंफलेली मानवीय कथा म्हणजेच विज्ञान साहित्य होय. विज्ञान साहित्यातून आजच्या वैज्ञानिक ज्ञानाच्या पायावर उदयाच्या जगाविषयी अनुमान केले जाते. प्रचलित विज्ञानाचा भक्कम आधार आणि त्याच्या आधारावर भविष्याविषयी केलेला बुद्धिनिष्ठ अंदाज यांच्या संदर्भात मानवी जीवनाची कल्पित रूपे हेरणे हेच विज्ञानसाहित्याचे रूप मराठीत ग्राहय धरले जाते.

**विज्ञानसाहित्याची वाटचाल :–**

मराठी विज्ञान साहित्याचा प्रवाह आपल्याकडे अलिकडेच नावारूपाला आलेला व सर्वपरिचित झालेला साहित्यातील प्रवाह आहे. वैज्ञानिक साहित्य हे विज्ञानातील सत्य, सूत्रे, घटिते यांचा वापर करुन घेणे म्हणजेच वैज्ञानिक साहित्य होय. विज्ञान साहित्य प्रवाह हा पाश्चात्यांकडून भारतात आलेला आहे. अजूनही आपल्याकडे विज्ञान साहित्याचा म्हणावा तितका विकास झालेला नाही. आपल्याकडे विज्ञानसाहित्यात आपल्याला विज्ञानकथा व विज्ञानकादंबरी हे दोनच वाङ्मय प्रकार बहरतांना दिसतात. विज्ञानकविता या प्रकाराचा म्हणावा तितका विकास झालेला दिसत नाही. मराठी विज्ञानसाहित्याच्या वाटचालीचा विचार करतांना पाश्चात्य विज्ञानकथांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. कारण सर्व आदय मराठी विज्ञानकथाकारांनी इंग्रजी अमेरिकन विज्ञानकथाकारांकडूनच स्फूर्तीवप्रेरणा घेऊनच विज्ञानकथा लिहिल्या आहेत हे मन मोकळे पणाने मान्य केलेले आहे. त्यामुळे मराठी विज्ञानकथांचे मूळ हे इंग्रजी विज्ञानकथेत सापडते. विज्ञानकथा म्हणजे 'सायन्स फिक्शन' ही संकल्पना जरी २० व्या शतकाच्या पूर्वार्धात मांडली गेली असली तरी त्याआधी विज्ञानाचा आधार घेऊन लिखान झाल्याचे दिसून येते. १९६० च्या नंतर मराठी विज्ञानकथेला विशेष महत्व प्राप्त झालेले दिसते. त्यामध्ये माणूस केंद्रस्थानी ठेवून विज्ञानकथा लिहिल्याचे दिसून येते. मराठीमध्ये विज्ञानकथा या प्रकाराचा चांगल्या प्रकारेविकास झालेला आहे. अगदी १९०० पासून विज्ञानकथा लेखनास प्रारंभ झाल्याचे दिसून येते. मराठीमध्ये पहिली

विज्ञानकथा कोणती या संदर्भात अनेक समीक्षकांची वेगवेगळी मते आहेत. निरंजन घाटे यांच्या मते इ.स. १९०० मध्ये 'केरळकोकीळ' च्या जून अंकामधये 'चंद्रलोकची सफर'हे प्रकरण छापण्यात आले. हे प्रकरण ज्यूल्स व्हर्नच्या कादंबरीचा अनुवाद होता. यापूर्वी मराठीत विज्ञानवाङ्मय असले तरी विज्ञानसाहित्य म्हणजे कथा, कादंबऱ्या या स्वरूपातील लेखन नव्हते. त्यादृष्टीने 'चंद्रलोकची सफर' ही विज्ञानकथा अतिशय महत्वपूर्ण ठरली. कदाचित काही समीक्षकांच्या मते 'चंद्रलोकची सफर' हे केरळ कोकीळ मध्ये संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये यांनीच अनुवाद करून छापली असावी. मराठी विज्ञानसाहित्य समिक्षकांमध्ये निरंजन घाटे यांनी पहिली विज्ञानकथा कोणती यासंबंधी बरेच संशोधन केले आहे. र. वा. मंचरकर यांच्या मतानुसार''आज उपलब्ध असलेली पहिली विज्ञानकथा म्हणून बा.गो. आपटेयांच्या कथेचा उल्लेख करता येईल. 'एका दिवसाच्या सुट्टीत' या बालकांसाठी लिहिलेल्या कथेत आनंद कर्ते वा.गो. आपटे यांनी शास्त्रीय सूत्र गुंफलेले होते''[२]

मंचरकर यांनी निरंजन घाटेआणि विश्वेश्वर सावदेकरांच्या साहित्याच्या अनुषंगाने १९१२ मध्ये प्रकाशित झालेल्या आपटे यांच्या कथेला पहिली विज्ञानकथा मानले आहे. यानंतर १९१५ मध्ये मासिक 'मनोरंजन' मध्ये श्री. बा. रानडे यांची 'तारेचे हास्य' (१९१५) ही प्रथम विज्ञानकथा आली. त्याचप्रमाणे वा. म. जोशी यांची 'अप्रकाशित किरणांचा दिव्य प्रकाश'(१९१६ नवपुष्प करंडक) वामलोचना (१९१६ नवपुष्य करंडक) श्री. बा. रानडे रेडियम (१९१६ उद्यान मासिक) भा. वि. वरेरकर 'सन २०१८', भा.रा.भागवत (मंगळावर स्वारी १९३४), त्र्य. रं. देवगिरीकर शरदलोकची सफर, ना. बा. कांगेकर मृत्यूकिरण या कालखंडात वेगवेगळ्या मासिकांमधून अनेक नविन विज्ञानकथा प्रकाशित होऊ लागल्या. मराठी विज्ञानकथांच्या या वाटचालीमध्ये नियतकालीकांचेही खूप महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. किंबहुना त्याच काळात केरळ कोकीळ, आनंद मासिक मनोरंजन उद्यम, चित्रमयजगत, सहयाद्री अशा अनेक नियतकालिकांमधून विज्ञानकथा प्रकाशित होवू लागल्या, महत्त्वपूर्ण विज्ञानकथा लेखकांपैकी नारायण धारप व द. पा. खोंबटे हे महत्वपूर्ण लेखक आहेत. खोंबटे यांचा 'माझे नाव रमाकांत वालावलकर' हा पहिला विज्ञानकथा संग्रह मराठीतील एक महत्वपूर्ण विज्ञानकथा संग्रह आहे. याच दरम्यान नारायण धारपांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या त्यांचा 'विज्ञानकथा यात्रा'हा एक महत्वपूर्ण विज्ञानकथा संग्रह आहे. धारप हे गूढकथेकडे, भयकथेकडे झुकलेले दिसतात तसेच भयकथाही त्यांचा लेखनामध्ये समाविष्ट राहिली आहे. धारपांमुळे विज्ञानकथा हया अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचण्यास मदत झालेली आहे. तद्वतच यशवंत रांजणकर इ.स. १९५८ पासून विज्ञानकथा लिहितात. त्यांचा 'शेवटचा दिस' (१९८२) हा कथासंग्रह एक प्रकारे मराठी विज्ञानकथांचे प्रतिनिधित्व करतो. या कथासंग्रहामध्ये सोळा कथा समाविष्ट आहेत. रांजणकर हे एक उत्तम दर्जाचे विज्ञानकथाकार आहेत.

विज्ञान साहित्याच्या वाटचालीच्या मुळाचा आढावा घेताना डॉ. निरंजन घाटे म्हणतात की, विज्ञान साहित्यात कथा, कादंबऱ्या, काव्य आणि नाटक यांचा समावेश होतो यात नाटक तर हाताच्या बोटावर मोजण्याइतकी असतील. नागपूर आकाशवाणीवर १९७८-७९ साली 'अमीवा' नावाचे एक नभोनाटय प्रा. फणसळकरांनी लिहून आकाशवाणी कलाकारांनी सादर केले होते. मुंबईच्या मराठी विज्ञानपरिषदेचे एकेकाळचे कार्यवाहक र. श. बाशीकर यांनी काही

एकांकिका लिहिल्या होत्या. पुणे आकाशवाणीवर 'नाते निसर्गाशी' या मालेत काही नभोनाट्य प्रसारित झाली होती. ती बाएफ या संस्थेत प्रकाशित केली आहेत. या पलीकडे चळवळ म्हणूनही या प्रकाराच्या एकांकिता सादर केलेल्या नाहीत आणि व्यावसायिक रंगभूमी तर दूरच आहे''[3].

वास्तविकपणे मराठीत विज्ञानकथा, कांदबरी ही बाळसण्यासाठी व तिचे स्थान लक्षात येण्यासाठी वाचक वर्गाला विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत वाट बघावी लागली कारण पाश्चात्य देशांप्रमाणे विज्ञान व तंत्रज्ञान संस्कृती इथे रुजायला बराच कालावधी लागला. ज्या काळामध्ये औद्योगिक क्रांती, विविध शाखांमधले संशोधन, तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला त्याच वेळेत विज्ञानसाहित्य देखील विकसित होण्यास सुरवात झाली. त्यावेळी मोजकीच विद्यापीठे व मोजकेच संशोधनही होत होते. प्रयोगशाळा देखील बोटावर मोजण्याइतक्याच होत्याअसे वातावरण तयार असल्यामुळे पुरेसे लेखकही तयार झाले नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चित्र थोडे बदलले. नवीन वैज्ञानिक धोरण तयार होऊन विज्ञानसंशोधनाला चालना मिळाली. जगात होत असलेले वैज्ञानिक बदल आपल्यापर्यंत पोहचले. व त्याचाच परिणाम लेखकांवर होऊन विज्ञान साहित्य निर्माण होवू लागले. विज्ञानातील प्रमेयांवर, सिद्धांतांवर, संशोधनावर, घटनाक्रमावर आधारलेल्या आणि त्याच विज्ञानाशी संबंधीत अशा भविष्यातील संभाव्य प्रश्नावर केलेल्या लेखनाला विज्ञान साहित्य संबोधले जाऊ लागले.

विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती माणसाला खूप फायदेशीर ठरली परंतु विज्ञानाचे परिणाम चांगले व वाईट हे संपूर्ण जगासमोर आले. पहिल्या महायुध्दाचा संपूर्ण जगातील विज्ञान साहित्यावर खूप मोठा परिणाम झाला. मानव जातीचा विध्वंस होण्यासाठी विज्ञान–तंत्रज्ञानाचा उपयोग किती भयानक पद्धतीने करता येतो हे युध्दाने जगासमोर आणले. आणि मग या आशयाच्या विज्ञानकथाही लिहिल्या जावू लागल्या. भा.रा. भागवतांनी १९३४ मध्ये 'मंगळावर स्वारी' ही पहिली अंतराळकथा लिहिली. त्यानंतर 'उडती छबकडी' (१९६६) हा कथासंग्रह लिहिला. त्याचप्रमाणे ना. के.बेहेरह्यांनी 'ध्येयाकडे' (१९३२) व वि.वा. शिरवाडकर हयांचा 'कल्पनेच्या तिरावर' (१९५६) हया विज्ञानकादंबऱ्या वाचकांच्या भेटीला आल्या. हया काळातील एक महत्वाची गोष्ट म्हणजे 'नवल' या मासिकाची सुरवात झाली. उपेक्षित व दुर्लक्षित वाङ्मयप्रकाराला वाहिलेले मासिक म्हणून 'नवल' मध्ये विज्ञानकथा प्रकाशित होऊ लागल्या. तद्वतच दुसऱ्या महायुद्धानंतर मोठया प्रमाणात नियतकालीकांमधून विज्ञान कथा छापल्या जावू लागल्या काही कथासंग्रही त्याच काळात प्रसिद्ध झाले परंतु विज्ञान कथेचे स्वरूप हे वाचकवर्गाला परिचित करून देण्यास भालबा केळकर हे महत्वाचे लेखक ठरले. त्यांनी 'विज्ञानाला पंख कल्पनेचे' हया विज्ञानकथा संग्रहात विज्ञानकथेबद्दल लिहिण्याचा प्रथमच प्रयत्न केला आधी ज्या विषयावर लिहायचे त्या विषयाची शास्त्रीय माहिती थोडक्यात देउन त्याचा कथेत कसा उपयोग करून घेता येईल हे सांगून झाल्यावर मग कथा सादर करायची. असे प्रयोग अमेरिकन विज्ञानसाहित्यात झाले असले, तरी मराठीत हा पहिलाच प्रयोग असे म्हणता येते.''[४]

मराठी साहित्यामध्ये विज्ञानसाहित्याला महत्व प्राप्त झाले ते १९७५ नंतर मराठी विज्ञान परिषदेने दरवर्षी विज्ञानकथा लेखनस्पर्धा सुरू केली. तेव्हाच डॉ. जयंत नारळीकरांसारखे आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त झालेले खगोलशास्त्रज्ञही विज्ञान कथा लिहू लागले. त्याच कालावधीमध्ये १९७४ च्या डिसेंबर महिन्यामध्ये तळेगाव येथे मराठी विज्ञान परिषदेचे

संमलन भरले व त्यात डॉ. जयंत नारळीकरांच्या 'कृष्ण विवर' हया कथेला मराठी विज्ञान परिषदेच्या प्रथम क्रमांकांचे बक्षीस मिळाले. हया घटनेचा एक चांगला परिणाम असा झाला की, हया लेखन प्रकाराला मराठी साहित्यामध्ये प्रतिष्ठा प्राप्त होण्यास मदत झाली.

मराठी विज्ञान साहित्याच्या मराठी वाटचालीचा विचार करीत असता मला वाटते की हे साहित्य सर्जनशील आहे. मराठी विज्ञान साहित्यामधून आपल्या समाजातील सर्वच बाबिंवर विचार करायला शिकविते या साहित्यात साचलेपणा नाही. याउलट नवनवीन प्रयोगांची मालिकाच पहावयास मिळते. या साहित्यातील कलात्मकता कमी न होता दिवसागणीक वृद्धींगतच होतांना दिसत आहे. मानवी समाजामध्ये जसजसे वैज्ञानिक शोध लागू लागले, तसतशी मानवाची प्रगती होत आहे. दळणवळण, संदेशन, औद्योगिक हया क्षेत्रांमध्ये प्रचंड वैज्ञानिक प्रगती झाली आहे. विज्ञानामुळे मानसाचे जीवन बदलले आहे. मानव आणि त्याची झालेली वैज्ञानिक प्रगती हा आशय बऱ्याच विज्ञानकथा कादंबऱ्यामध्ये लेखकांनी सांगितलेला आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या अनेक शोधांचा उपयोग विज्ञानसाहित्याच्या कथानकामध्ये झालेला दिसतो. विज्ञानामध्ये जे लहानमोठेशोध लागले, त्या सर्व शोधांवर विज्ञानकथांचे कथानक असलेले दिसते. भविष्यकाळामध्ये वैज्ञानिक प्रगती किती जास्त प्रमाणात असेल व त्यामुळे मानवी जीवन किती प्रगत होवुन जाईल हयाचे चित्रण विज्ञानसाहित्याच्या लेखकांनी आपल्या कल्पनेच्या साहाय्याने रंगवलेले आहे. इतकेच काय तर मराठी विज्ञानसाहित्याविषयी मला इथे सांगताना इतका अभिमान वाटतो की विज्ञान व साहित्य हा इतका जवळचा विषय व रसिक वाचकांना इतका जवळचा वाटला व आवडला की अन्यभारतीय भाषांमध्ये देखील या विषयावर विपुल प्रमाणात लिखान झालेले आपल्याला दिसून येते.

भारताच्या अनेक वैशिष्ठ्यांपैकी एक महत्वपूर्ण वैशिष्ठ्य म्हणजे भारतीय भाषा होय. जगाच्या पाठीवर भारताला मोठी ओळख मिळण्याचे कारण की भारतातील विविधता होय. तीच विविधता आपल्याला भाषांमध्ये सुद्धा दिसून येते. भारतामध्ये विविध भाषा बोलल्या जातात. भारतात असणाऱ्या भाषांमध्ये साहित्यनिर्मितीही मोठया प्रमाणात होत आहे. त्यामध्ये विज्ञानसाहित्य हे अतिशय वाचकप्रिय साहित्य ठरलेले आहे. विज्ञानसाहित्याला अलीकडे खूप चांगले दिवस आलेले आहे. त्याचाच परिपोष म्हणजे की, मराठी प्रमाणेच उड़िया, उर्दू, कन्नड, तेलगु, बंगाली अशा अन्य भारतीय भाषांमध्येही विज्ञानसाहित्याचे लेखन झालेले आहे.

**संदर्भ :-**


१) घाटे निरंजन – 'महाराराष्ट्र साहित्य पत्रिका', विज्ञानकथा विशेषांक संपादक सु.प्र. कुलकर्णी उद्‌धृत – अंक ३१९, ऑक्टोंबर २००६ ते डिसेंबर २००६, पृ.क्र. ७

२) मंचरकर र.बा. – 'मराठी विज्ञानकथा', उ नि पृ. क्र. ८

३) घाटे निरंजन – 'विज्ञान, मराठी आणि विज्ञान वाङ्मय', प्रथमावृत्ती २००० पद्मगंधा प्रकाशन, पुणे पृ.क्र. ३१

४) घाटे निरंजन – संपादक 'निवडक मराठी विज्ञानकथा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २००१ पृ.क्र. ९१